# * अर्पणपत्रिका *

" माझे शिक्षण पूर्ण करण्यासाठी
माझ्या पंखात बळ देणाऱ्या
माझ्या आई–बाबा यांना....."

*****

# ऋणनिर्देश

**''माधव कोंडविलकर यांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास'' ('अनाथ' आणि 'आता उजाडेल' या कादंबऱ्यांच्या अनुषंगाने)** ही प्रबंधिका सादर करताना आनंद होतो आहे. ही प्रबंधिका तयार करीत असताना ज्यांनी ज्यांनी मला सहकार्य केले त्या सर्वांचा ऋणनिर्देश करणे मला अगत्याचे वाटते.

माझ्या प्रबंधिकेचे मार्गदर्शक डॉ. सुनील चंदनशिवे यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजते. सखोल अभ्यास, विद्यार्थींना समजून सांगण्याची पद्धत आणि प्रत्येक गोष्टीतील शिस्तबद्धता या गुणामुळे मी भरपूर काही शिकले ते मला माझ्या भावी काळातही नक्कीच मार्गदर्शक ठरेल. मला त्यांनी वेळोवेळी चूका दाखवून आत्मियतेने व मौलिक मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच या प्रबंधिकेला मूर्तरूप आले आहे. त्यामुळे त्यांच्या ऋणात राहणे मी पसंत करते.

त्याचप्रमाणे शिवाजी विद्यापीठ, मराठी विभाग प्रमुख डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. कृष्णा किरवले, डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. रणधीर शिंदे, प्रा. हिमांशू स्मार्त यांनीही वेळोवेळी माझ्या संशोधन कार्याबाबत मार्गदर्शन केले. याबद्दल मी त्यांचीही ऋणी आहे.

डॉ. जी. पी. माळी, डॉ. प्रकाश कुंभार, प्रा. भैरव कुंभार, प्रा. सुखदेव नरळे, प्रा. यु. के. सकट प्रा. सौ. एस. एस. मिसाळ याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाचे प्राचार्य एन. के. शिंदे यांचे वेळोवेळी प्रोत्साहन आणि सहकार्यामुळे संशोधनाला गती मिळाली.

मी ज्यांच्या कादंबऱ्यावर एम. फिल. करीत आहे. ते लेखक माधव कोंडविलकर यांनी पुरविलेल्या साहित्याबद्दल त्यांचे ऋण मी कधीच विसरू शकणार नाही. त्यांनी वेळोवेळी आपुलकीने विचारपूस करून मला प्रोत्साहन दिले त्यामुळे मी ही प्रबंधिका पूर्ण करू शकले.

याचबरोबर माझे पती प्रा. भीमसेन एकनाथ आवटे यांनी माझ्या लेखनातील व्याकरणदृष्ट्या चूका दाखवून प्रबंधिका लिहिण्यास सहकार्य केले. तसेच माझ्या मैत्रिणी कमल कांबळे, सविता गायकवाड, सुनिता कांबळे, माधुरी बिडवे, वनश्री सोने, वैशाली चौगुले तसेच माझे भाऊ संभाजी शिंदे, किरण शिंदे, मित्र सतेज दणाणे, संदीप कांबळे, श्रीगणेश गायकवाड, रामदास नाईकनवरे, विनोद कांबळे, मारूती तुपेरे, प्रकाश नाईक, गजानन अपिने, चंद्रकांत कदम, प्रदीप कांबळे, बळीराम मगदूम, माणिक वांगीकर या सर्व मित्र-मैत्रिणी यांच्याशी वेळोवेळी केलेल्या चर्चा प्रबंधिकेच्या पूर्णत्वासाठी महत्त्वाच्या ठरल्या. माझे शिक्षण पूर्ण व्हावे म्हणून उन्हातान्हाचा विचार न करता शेतात काम करून मला वेळोवेळी प्रोत्साहन व मार्गदर्शन करणारे माझे आई वडील यांचे सतत सहकार्य मिळाले. त्यांचे सहकार्य मिळाले नसते तर ही प्रबंधिका पूर्ण करू शकले नसते. त्यामुळे तिचे ऋण आयुष्यभर न विसरण्यासारखे आहेत. आई-वडिलांची माया देणारे प्रेमळ सासू-सासरे भागूबाई एकनाथ आवटे, माई, संपती, माझे दीर अर्जून, जाऊ रूपा माझा मुलगा जीवन उर्फ विश्वजीत आणि घरातील सर्वांनी शांततेचे वातावरण निर्माण करून मोलाचे सहकार्य केले.

मराठी विभागाचे लिपिक व शिपाई यांचे सतत सहकार्य मिळाले. शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाचे ग्रंथपाल व सर्व सेवक वर्ग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाचा सर्व प्राध्यापक वर्ग आणि ग्रंथपाल ई. बी. जाधव व सर्व सेवक वर्ग यांनी मला लागणारी संदर्भाची पुस्तके पाहिजे त्यावेळी उपलब्ध करून दिली त्याबद्दल मी या सर्वांची आभारी आहे. तसेच नाइट कॉलेज व करवीर वाचनालय, कोल्हापूर यांचे बहुमोल सहकार्य मिळाले.

याचबरोबर 'कमवा आणि शिका' व 'मागेल त्याला काम' या योजनेचे व पात्रता विभागातील सेवक वर्ग यांचे सहकार्य व प्रोत्साहन मिळाले, सुबक कॉम्प्युटर टाइपिंग करून संतोष मोडे व अर्चना खैरमोडे हीने मोलाचे सहकार्य केले. या सर्वांच्या विषयी ऋण व्यक्त करणे मला अगत्याचे वाटते.

**वनिता बापू शिंदे**

---------------



महादेव गुणाजी कोंडविलकर

जन्म : १५ जुलै १९४१